## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पंडीत दीनदयाळ उपाध्याय अध्यासन ई-पत्रिकेचे प्रकाशन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते आज दि. १० मे रोजी विद्यापीठात करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, अध्यासन प्राध्यापक प्रा. पी.पी. माहुलीकर, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे व इतर उपस्थित होते. या अध्यासनाची ई-पत्रिका प्रकाशित करणेबाबत अध्यासनाच्या सल्लागार समितीने निर्णय घेतला होता. त्यानुसार पंडीत दीनदयाळ उपाध्याय अध्यासन ई-पत्रिका तयार करण्यात आली. या ई-पत्रिकेत पंडीत दीनदयाळ यांची माहिती, अध्यासनाची व सल्लागार समितीची माहिती तसेच पंडीत दीनदयाळ यांच्या एकात्म मानव दर्शन बाबतचा धुळे येथील सीए प्रकाश पाठक यांच्या लेखाचा समावेश आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने केवळ कबचौ उमवि, जळगाव यांनापंडीत दीनदयाळ अध्याासन केंद्र सुरु करण्यासाठी सन २०१८ मध्ये ४४ लाख २६ हजार रूपयांचे अनुदान दिले आहे. या अध्यासनाद्वारे पंडीत दयाळजींच्या विचारांचा अभ्यास करणे आणि ते विचार कालानुकूल व तंत्रानुकूल करण्याचे काम केले जाणार आहे. तसेच विविध उपक्रम व कार्यक्रम या केंद्राद्वारे केले जाणार आहे.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १० मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

कुलसचिव